(इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

[२००२] १ एस.सी.आर ७५

**दिलावर बालू कुराणे**

*- विरुद्ध -*

**स्टेट ऑफ महाराष्ट्र**

*८ जानेवारी २००२*

[सय्यद शाह मोहम्मद कादरी आणि एस. एन. फुकन, न्यायमूर्ती]

*भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९४७ / भारतीय दंड संहिता, १८६० - कलम ५ (२) आणि ५(१) (डी) / कलम १६१ आणि ४७७ ए.*

*आरोपी - खाजगी महाविद्यालयाचे अधिव्याख्याता - विद्यापीठाने उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करण्यासाठी नियुक्त केलेले - गुण वाढवण्यासाठी लाच घेतल्याचा आरोप - आरोपी विरुद्ध प्रथमदर्शनी सयुक्तिक बाजू तयार करण्यात आली नव्हती - असा निर्णय देण्यात आला की, त्यावरील आरोप हे असंभवनीय व असंगतीची आठवण करून देणारे आहेत तसेच आरोप अखेरीस दोषसिद्धीचा कळस गाठेल असा सुदूर योगायोग देखील नाही.*

*शिवाजी विद्यापीठ अधिनियम, १९७४ - कलम ७३ (४)*

*विद्यापीठाने उत्तरपत्रिकांच्या मूल्यांकनासाठी नियुक्त केलेल्या खाजगी महाविद्यालयाचे अधिव्याख्याते भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमच्या कलम ५ अंतर्गत कार्यवाही करण्यासाठी संबंधित वेळी लोकसेवक होते किंवा नाही - कलम ७३(४) अंतर्गत लोकसेवक आहेत कारण त्यांची नियुक्ती विद्यापीठाने एका विशिष्ट कामासाठी केली होती आणि हे भा.दं.वि. च्या कलम २१ अंतर्गत लोकसेवक नव्हते - भारतीय दंड संहिता, १८६० - कलम २१ - भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९४७ - कलम ५.*

*फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३*

*कलम २२७ खाली अधिकारितेची व्याप्ती - प्रकरणाची व्यापक संभाव्यता, पुराव्याचा व सादर केलेल्या कागदपत्रांचा एकूण परिणाम यापुरते मर्यादित - प्रकरणाच्या साधक बाधक मुद्द्यांवर फिरती चौकशी करू नये आणि प्रकरणाला एखाद्या खटल्याप्रमाणे तोलावे.*

*संविदेचे निर्वचन*

*वैधानिक हेतू - संविदेतील शब्द बाजूला सारले जाऊ नयेत कारण न्यायालये नेहमीच असे गृहीत धरतात की विधानमंडळाने त्याचा प्रत्येक भाग एखाद्या हेतूसाठी समाविष्ट केला आहे.*

*समास टिपचा विचार- असा निर्णय देण्यात आला की, जेव्हा कलम मधील भाषा स्पष्ट व असंदिग्ध असेल, तेव्हा समास टीप चा संदर्भ घेण्याची आवश्यकता नाही - ते कलम मधील भाषेचा अर्थ मर्यादित करू शकत नाही - शिवाजी विद्यापीठ अधिनियम, १९७४ - कलम ७३ (४).*

**विद्यापीठाच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करण्यासाठी महानगरपालिकेद्वारे संचालित महाविद्यालयाचे अधिव्याख्याता, अपीलकर्ता यांची नियुक्ती करण्यात आली होती. उमेदवाराचे गुण वाढवण्यासाठी त्याने पैश्याची मागणी केली व स्वीकारली, असा आरोप करण्यात आला होता. कथित कृत्याची माहिती मिळाल्यानंतर कुलसचिवांनी घटनेच्या ७ दिवसांनंतर प्रथम माहिती अहवाल दाखल केला. आरोपीकडून कोणत्याही गुन्हादार्शक वस्तू मिळून आल्या नाहीत. पोलिसांनी दहा महिन्यांनंतर साक्षीदारांचे जबाब नोंदवले. अभियोग नुसार स्वीकार सिद्ध करण्यासाठी खाजगी व्यक्तींनी सापळा रचला होता. आरोपी-अपीलकर्त्याविरुद्ध भा.दं.वि. चे कलम १६१ / ४७७ ए व भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९४७ च्या कलम ५ (२) आणि ५(१) (डी) अंतर्गत आरोपपत्र दाखल करण्यात आले.**

**अपीलकर्त्याने आरोप रद्द करण्यासाठी संविधानाचे अनुच्छेद २२७ सह फौ. प्र. सं. चे कलम ४८२ खाली रिट याचिका दाखल केली. उच्च न्यायालयाने अपीलकर्त्याला न्याय चौकशी न्यायालयात जाण्याचे निर्देश दिले.**

**अपीलकर्त्याने विशेष न्यायाधीशांसमोर कलम फौ. प्र. सं. चे कलम २२७ अंतर्गत अर्ज दाखल केला जो गुणवत्तेचा विचार न करता आणि अपीलकर्ता हा लोकसेवक असल्याचे**

गृहीत धरून फेटाळण्यात आला. त्या विरोधात उच्च न्यायालयात दाखल केलेली फेरपुनरीक्षण याचिका देखील फेटाळण्यात आली.

या न्यायालयाला केलेल्या अपीलात, अपीलकर्त्याने असा युक्तिवाद केला की तो लोकसेवक नाही आणि शिवाजी विद्यापीठ अधिनियम, १९७४ च्या कलम ७३(४) अंतर्गत लोकसेवक होण्यासाठी, एखादी व्यक्ती विद्यापीठाचा वेतनी अधिकारी किंवा कर्मचारी असणे आवश्यक आहे आणि कलम ७३ चे समास टीप लक्षात घेता, कलम ७३ (४) विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांना सेवेच्या शर्ती म्हणून लागू होईल.

अपील अनुमत करताना न्यायालयाने

असा निर्णय दिला कि : १.१. अपीलकर्ता खाजगी महाविद्यालयाचे अधिव्याख्याता असल्याने ते भारतीय दंड संहिता कलम २१ मध्ये समाविष्ट असलेल्या लोकसेवकाच्या व्याख्येत येणार नाही. परंतु, विद्यापीठाने त्यांची नियुक्ती एका विशिष्ट कामासाठी, म्हणजे उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करण्यासाठी केली होती, त्यामुळे ते शिवाजी विद्यापीठ अधिनियम, १९७४ च्या कलम ७३(४) अंतर्गत संबंधित वेळी लोकसेवक होते.[८१- डी-ई]

*स्टेट ऑफ गुजरात - विरुद्ध - मानशंकर प्रभासांकर द्विवेदी,* [१९७३] १ एस. सी. सी. ३१३, उल्लेखनीय.

१.२. संविदेतील शब्द बाजूला सारले जाऊ नयेत कारण न्यायालये नेहमीच असे गृहीत धरतात की विधानमंडळाने त्याचा प्रत्येक भाग एखाद्या हेतूसाठी समाविष्ट केला आहे आणि वैधानिक हेतू असा आहे कि सिविदेच्या प्रत्येक भागाचा प्रभाव असावा. *अधिनियमाच्या कलम ७३(४) मधील भाषा स्पष्ट आहे आणि या कलमांत सूचित केल्याप्रमाणे व्यक्तींच्या श्रेणी उपकलम (४) च्या कक्षेत आणण्याचा विधानमंडळाचा हेतू होता आणि हे व्यक्ती लोकसेवक मानले जातील.* [८०- जी-एच; ८१-ए]

१.३. कलम ७३ ची समास टीप लक्षात घेता, कलम ७३(४) विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांना सेवेच्या शर्ती म्हणून लागू होईल असे म्हणता येणार नाही. कलम ७३(४) मधील भाषा स्पष्ट व असंदिग्ध असल्याने, समास टीप चा संदर्भ घेण्याची आवश्यकता नाही आणि

कोणत्याही परिस्थितीत समास टीप, कलम मधील भाषेचा अर्थ मर्यादित करू शकत नाही. [८१- ब]

२. अपीलकर्त्याविरुद्ध प्रथमदर्शनी सयुक्तिक बाजू तयार करण्यात आली नव्हती. कथित सापळ्यात कोणत्याही पोलीस संस्थेचा सहभाग नव्हता; सात दिवसांनंतर एफ. आय. आर. दाखल करण्यात आला; आरोपींच्या ताब्यात कोणतेही गुन्हादार्शक वस्तू सापडले नाहीत आणि घटनेच्या दहा महिन्यांनंतर पोलिसांनी साक्षीदारांची जबाब नोंदवले. आरोपींविरोधातील गंभीर संशयाबाबत बोलायचे तर खरे तर फिर्यादी पक्ष कोणताही संशय व्यक्त करू शकलेला नाही.[८२- एफ]

३. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २२७ अंतर्गत अधिकारांचा वापर करताना, कायद्याची निश्चित स्थिती अशी आहे की न्यायाधीशांना या कलमांतर्गत आरोप निश्चित करण्याच्या प्रश्नावर विचार करताना आरोपींविरुद्ध प्रथमदर्शनी खटला तयार करण्यात आला आहे की नाही हे शोधण्याच्या मर्यादित हेतूसाठी पुराव्याची छाननी आणि तोलण्याचा निःसंशय अधिकार आहे; जेव्हा न्यायालयासमोर सादर करण्यात आलेल्या पुराव्यात आरोपींविरुद्ध गंभीर संशय असल्याचे उघड झाले आहे, ज्याचे योग्य स्पष्टीकरण दिले गेले नाही, तेव्हा आरोप निश्चित करण्यात आणि खटल्याची कार्यवाही करण्यात न्यायालय पूर्णपणे न्याय्य ठरेल; जर दोन मते समानपणे शक्य असतील आणि न्यायाधीशांना असे वाटले असेल की त्यांच्यासमोर सादर केलेला पुरावा आरोपीविरुद्ध काही शंका निर्माण करतो परंतु गंभीर शंका निर्माण करत नाही, तर तो आरोपीला आरोपमुक्त करणे आणि फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २२७ अंतर्गत आपल्या अधिकारितेचा वापर करणे पूर्णपणे न्याय्य ठरेल, न्यायाधीश केवळ टपाल कार्यालय किंवा फिर्यादीचे मुखपत्र म्हणून कार्य करू शकत नाही, परंतु त्यांना न्यायालयासमोर सादर करण्यात आलेल्या प्रकरणाची व्यापक संभाव्यता, पुराव्याचा व सादर केलेल्या कागदपत्रांचा एकूण परिणामाचा विचार करावा लागतो, मात्र त्यांनी प्रकरणाच्या साधक बाधक मुद्द्यांवर फिरती चौकशी करू नये आणि प्रकरणाला एखादि न्यायचौकशी करीत असल्याप्रमाणे पुराव्यास तोलावे. [८१- एफ-जी-एच; ८२-ए]

*युनियन ऑफ इंडिया वि. प्रफुल्ल कुमार सामल आणि अन्य* , [१९७९] ३ एस. सी. सी. ५, संदर्भित.

फौजदारी अपील अधिकारिता : फौजदारी अपील क्र. ०८/२००२

फौजदारी पुनरिक्षण अर्ज क्र. १९/१९९० मुंबई उच्च न्यायालयाने दि. ०७/०३/१९९० रोजी दिलेल्या न्यायनिर्णय व आदेशावरून.

अपीलकर्त्याच्या वतीने विश्वजीत सिंगसाठी निखिल सखारदाने, अरुण पेडनेकर आणि मीनाक्षी सखारदंडे.

उत्तरवादीच्या वतीने एस. व्ही. देशपांडेसाठी एच. डब्ल्यू. ढाबे आणि एस. एस. शिंदे.

न्यायालयाचा न्यायनिर्णय **फुकन, न्यायमूर्ती** यांनी दिला.

अनुज्ञा देण्यात आली.

संबंधित वेळी अपीलकर्ता वाय. बी. चव्हाण महाविद्यालय, कोल्हापूर, महाराष्ट्र राज्य, महानगरपालिकेद्वारे संचालित आणि शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरशी संलग्न असलेल्या महाविद्यालयात अधिव्याख्याता होते. अपीलकर्त्याला विद्यापीठाकडून बी. कॉम. द्वितीय वर्ष अकाउंटन्सी (थिअरी) पेपर चे मूल्यांकन करण्यासाठी पत्र प्राप्त झाले, जे स्वीकारण्यात आले होते. दि. १ मे १९८६ रोजी अशोक सालोखे, ज्याने हि परीक्षा दिली होती, त्याने अपीलकर्त्याकडे धाव घेतली आणि अपीलकर्त्याने तपासायचा असलेला वरील पेपर पास करण्यात असमर्थता व्यक्त केली. अभियोग नुसार, अपीलकर्त्याने त्याच्याकडून रु.४००/- मागितले आणि दुसऱ्या दिवशी संध्याकाळी ४:३० च्या सुमारास अपीलकर्त्याने रु. ४००/- स्वीकारले आणि त्यानंतर उत्तरपुस्तिकेवर देण्यात आलेल्या पूर्वीच्या प्राप्त गुण वाढवून देण्यात आले ज्यामुळे त्या विद्यार्थ्याला प्रश्नास्पद पेपर पार करता आला. अभियोग पक्षाचे पुढील म्हणणे असे होते की, याचिकाकर्त्याने रक्कम स्वीकारल्याचे सिद्ध करण्यासाठी खाजगी व्यक्तींनी २ मे रोजी सापळा रचण्याचा प्रयत्न केला. कथित घटनेची माहिती मिळाल्यावर विद्यापीठाच्या कुलसचिवांनी अपीलकर्त्याकडून सर्व उत्तरपत्रे काढून घेतली. एका आठवड्यानंतर, म्हणजेच ९ मे १९८६ रोजी विद्यापीठाचे उप-कुलसचिव यांनी अपीलकर्त्याविरुद्ध पोलिसांसमोर प्रथम माहिती अहवाल दाखल केला. दुसऱ्या दिवशी, पोलिसांनी अपीलकर्त्याच्या अनुपस्थितीत त्याच्या घराची झडती घेतली परंतु काहीही गुन्हादर्शक आढळले नाही. वरील कथित घटनेनंतर दहा महिन्यांनी पोलिसांनी सालोखे आणि

सावंत या व्यक्तींचे जबाब नोंदवले आणि त्यानंतर अपीलकर्त्याविरुद्ध भारतीय दंड संहिता चे कलम १६१ / ४७७ ए आणि भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९४७ च्या कलम ५ (२) आणि ५(१) (डी) अंतर्गत आरोपपत्र दाखल करण्यात आले आणि अपीलकर्त्याला आदेशिका जारी करण्यात आली आणि त्याला कथित गुन्ह्यांसाठी न्यायचौकशीस तोंड देण्यास फर्मावण्यात आले. अपीलकर्त्याने आरोप रद्द करण्यासाठी संविधानाचे अनुच्छेद २२७ सह फौ. प्र. सं. चे कलम ४८२ खाली रिट याचिका दाखल केली, जिस 'प्रथमदर्शनी अभियोग पक्ष ठिसूळ पायावर उभे असल्याचे दिसते' असे निरीक्षण करून निकाली काढण्यात आली. तथापि, आरोप रद्द करण्याऐवजी अपीलकर्त्याला न्यायचौकशी न्यायालयाकडे जाण्याचे निर्देश दिले. त्यानुसार, फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २२७ अन्वये विशेष न्यायाधीशांसमोर अर्ज दाखल करण्यात आला, जो फेटाळण्यात आला. सदर आदेशाने व्यथित होऊन, अपीलकर्त्याने उच्च न्यायनिर्णयासमोर पुनरीक्षण याचिका दाखल केली, जी आक्षेपित न्यायनिर्णयाने खारीज करण्यात आली.

दोन मुद्द्यांवर आपण विचार करणे आवश्यक आहे, म्हणजे (१) भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमच्या कलम ५ अंतर्गत कार्यवाही करण्यासाठी संबंधित वेळी लोकसेवक होते किंवा नाही, आणि (२) आरोपीवरील आरोप हे असंभवनीय व असंगतीची आठवण करून देणारे आहेत किंवा नाही तसेच आरोप अखेरीस दोषसिद्धीचा कळस गाठेल असा सुदूर योगायोग देखील आहे किंवा नाही.

आम्ही येथे असे सांगू शकतो की विशेष न्यायाधीशांनी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २२७ अंतर्गत अर्जावर विचार करताना अर्जाचा गुणवत्तेवर अजिबात विचार केला नाही आणि मुख्यतः अपीलकर्ता लोकसेवक होता की नाही हे ठरवण्यासाठी कार्यवाही केली. उच्च न्यायालयाने अभिलेखावरील पुराव्याचे विश्लेषण न करता, 'अपीलकर्त्याने कलम ४७७ए व्यतिरिक्त इतर गुन्हे केल्याने निश्चितच गंभीर संशय निर्माण होतो' या आधारावर युक्तिवाद खारीज केला. विशेष न्यायाधीशांनी असे म्हटले की अपीलकर्ता हा लोकसेवक आहे परंतु उच्च न्यायालयाने हा प्रश्न अनुत्तरित ठेवला.

हे मान्य आहे की, अपीलकर्ता खाजगी महाविद्यालयाचे अधिव्याख्याता असल्याने ते भारतीय दंड संहिता कलम २१ मध्ये समाविष्ट असलेल्या लोकसेवकाच्या व्याख्येत येणार

नाही. शिवाजी विद्यापीठ अधिनियम, १९७४ मध्ये कलम ७३ चे उपकलम (४) अशी एक विशेष तरतूद आहे, जी खाली उद्धृत केली आहेः

"सेवेच्या शर्ती : कलम ७३:

(१) ......

(२)........

(३).......

(४) विनिर्दिष्ट मुदतीसाठी किंवा विनिर्दिष्ट कामासाठी विद्यापीठाने नेमलेले असतील आणि ज्यांना विद्यापीठ निधीतून भत्ते, किंवा इतर दान यासारखे कोणतेही परिश्रमिक मिळत असेल असे विद्यापीठाचे वेतन अधिकारी व कर्मचारी धरून विद्यापीठाचे सर्व वेतन अधिकारी आणि कर्मचारी हे, त्यावेळी अंमलात असलेल्या फौजदारी कायद्याच्या प्रयोजनासाठी लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल."

वरील उपकलम लक्षात घेता, अपीलकर्ता हा लोकसेवक मानला जाईल की नाही यावर आपल्याला विचार करावा लागेल.

वरील उपकलमाचे साधे वाचन केल्यावर, खालील श्रेणीतील व्यक्ती सर्व फौजदारी कायद्यांच्या उद्देशांसाठी लोकसेवक मानल्या जातील. हे वर्ग पुढीलप्रमाणे आहेतः

१. विद्यापीठाचे सर्व वेतन अधिकारी आणि कर्मचारी;

२. ज्यांना विद्यापीठाने विनिर्दिष्ट मुदतीसाठी किंवा विनिर्दिष्ट कामासाठी विद्यापीठाने नेमलेले आहे;

३. ज्या व्यक्तींना विद्यापीठाच्या निधीतून भत्ते, शुल्क किंवा इतर दान यासारखे कोणतेही परिश्रमिक मिळते.

अपीलकर्त्याच्या विद्वान वकिलाने असा युक्तिवाद केला आहे की उपकलम (४) मध्ये वेतनी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या दोन श्रेणी आहेत, म्हणजे (१) विनिर्दिष्ट मुदतीसाठी किंवा विनिर्दिष्ट कामासाठी विद्यापीठाने नेमलेले अधिकारी किंवा कर्मचारी किंवा (२) विद्यापीठाच्या निधीतून भत्ते, शुल्क किंवा इतर दान यासारखे कोणतेही परिश्रमिक मिळवणारे अधिकारी आणि कर्मचारी आणि दुसऱ्या शब्दांत, विद्वान वकिलांनुसार, उपकलम (४) अंतर्गत लोकसेवक होण्यासाठी एखद्या व्यक्तीस सर्वप्रथम विद्यापीठाचा वेतनी अधिकारी किंवा कर्मचारी असणे आवश्यक आहे. विद्वान वकिलानुसार, जर विधानमंडळाचा हेतू कोणत्याही प्रकारचे परिश्रमिक प्राप्त करणारे सर्व व्यक्तींना या तरतुदीखाली समाविष्ट करणे असा असता तर, 'कोण' ('who') या शब्दा अगोदर 'किंवा' ('or') हा शब्द वापरण्याऐवजी 'कोणतीही व्यक्ती' ('any person') हे शब्द वापरले असते आणि 'किंवा' ('or') हा शब्द अधिकचा असे न सुचविता पर्याय सुचविते.

अर्थ लावण्याचे हे एक निश्चित तत्व आहे की, संविदेतील शब्द बाजूला सारले जाऊ नयेत कारण न्यायालये नेहमीच असे गृहीत धरतात की विधानमंडळाने त्याचा प्रत्येक भाग एखाद्या हेतूसाठी समाविष्ट केला आहे आणि वैधानिक हेतू असा आहे कि संविदेच्या प्रत्येक भागाचा प्रभाव असावा. उपकलम (४) मधील भाषा स्पष्ट आहे आणि या कलमांत सूचित केल्याप्रमाणे व्यक्तींच्या श्रेणी उपकलम (४) च्या कक्षेत आणण्याचा विधानमंडळाचा हेतू होता आणि हे व्यक्ती लोकसेवक मानले जातील. सबब आम्ही विद्वान वकिलाचा युक्तिवाद स्वीकारण्यास असमर्थ आहोत कारण इतर कोणताही अर्थ लावणे विधानमंडळाच्या हेतूच्या विरोधात जाईल.

कलम ७३ च्या किरकोळ नोंदीकडे आमचे लक्ष वेधून, अपीलकर्त्याच्या विद्वान वकिलाने असा युक्तिवाद केला की कलम ७३(४) विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांना सेवेच्या शर्ती म्हणून लागू होईल.  सबब हा युक्तिवाद आम्हाला मान्य नाही.

स्टेट ऑफ गुजरात - विरुद्ध - मानशंकर प्रभासांकर द्विवेदी, [१९७३] १ एस. सी. सी. ३१३, मधील या न्यायालयाच्या निर्णयाकडे आमचे लक्ष वेधले गेले. त्या प्रकरणात, सरकारी महाविद्यालयाच्या एका अधिव्याख्याताची विद्यापीठाने परीक्षक म्हणून नियुक्ती केली होती आणि असे अभिकथित करण्यात आले की, त्याने परीक्षेत उमेदवारावर कृपा दाखवल्याबद्दल

त्या उमेदवाराकडून रु. ४००/-  घेतले होते. या तथ्यांवर, या न्यायालयाने असे म्हटले आहे की विद्यापीठाने परीक्षक म्हणून नियुक्त केलेली व्यक्ती जरी ती सरकारी महाविद्यालयाची अधिव्याख्याता असली तरी ती भारतीय दंड संहिता चे कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक होणार नाही. आम्ही आधीच पाहिले आहे की अपीलकर्ता उक्त कलम २१ च्या कक्षेत येणार नाही आणि त्यामुळे त्या निर्णयाचा काही उपयोग होणार नाही. प्रस्तुत प्रकरणात, अपीलकर्त्याची नियुक्ती विद्यापीठाने एका विशिष्ट कामासाठी केली होती, म्हणजे उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करण्यासाठी आणि सबब, तो अधिनियमाच्या कलम ७३ च्या उपकलम (४) अंतर्गत संबंधित वेळी लोकसेवक होता.

आता पुढचा प्रश्न असा आहे की अपीलकर्त्याविरुद्ध प्रथमदर्शनी सयुक्तिक बाजू तयार करण्यात आली आहे का? फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २२७ अंतर्गत अधिकारांचा वापर करताना, कायद्याची निश्चित स्थिती अशी आहे की न्यायाधीशांना या कलमांतर्गत आरोप निश्चित करण्याच्या प्रश्नावर विचार करताना आरोपींविरुद्ध प्रथमदर्शनी खटला तयार करण्यात आला आहे की नाही हे शोधण्याच्या मर्यादित हेतूसाठी पुराव्याची छाननी आणि तोलण्याचा निःसंशय अधिकार आहे; जेव्हा न्यायालयासमोर सादर करण्यात आलेल्या पुराव्यात आरोपींविरुद्ध गंभीर संशय असल्याचे उघड झाले आहे, ज्याचे योग्य स्पष्टीकरण दिले गेले नाही, तेव्हा आरोप निश्चित करण्यात आणि खटल्याची कार्यवाही करण्यात न्यायालय पूर्णपणे न्याय्य ठरेल; जर दोन मते समानपणे शक्य असतील आणि न्यायाधीशांना असे वाटले असेल की त्यांच्यासमोर सादर केलेला पुरावा आरोपीविरुद्ध काही शंका निर्माण करतो परंतु गंभीर शंका निर्माण करत नाही, तर तो आरोपीला आरोपमुक्त करणे आणि फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २२७ अंतर्गत आपल्या अधिकारितेचा वापर करणे पूर्णपणे न्याय्य ठरेल, न्यायाधीश केवळ टपाल कार्यालय किंवा फिर्यादीचे मुखपत्र म्हणून कार्य करू शकत नाही, परंतु त्यांना न्यायालयासमोर सादर करण्यात आलेल्या प्रकरणाची व्यापक संभाव्यता, पुराव्याचा व सादर केलेल्या कागदपत्रांचा एकूण परिणामाचा विचार करावा लागतो, मात्र त्यांनी प्रकरणाच्या साधक बाधक मुद्द्यांवर फिरती चौकशी करू नये आणि प्रकरणाला एखादि न्यायचौकशी करीत असल्याप्रमाणे पुराव्यास तोलावे. [पहा, युनियन ऑफ इंडिया वि. प्रफुल्ल कुमार सामल आणि अन्य , [१९७९] ३ एस. सी. सी. ५].

आधी नमूद केल्याप्रमाणे, विशेष न्यायाधीशांनी किंवा उच्च न्यायालयाने आरोप निश्चित करताना अभिलेखावरील पुराव्याचा विचार केला नाही तसेच सद्सद्विवेकबुद्धीचा वापर केला नाही व विशेष न्यायाधीशांनी केवळ टपाल कार्यालय म्हणून भूमिका बजावली. अपीलकर्त्याने दाखल केलेली रिट याचिका निकाली काढताना उच्च न्यायालयाने आरोपींविरुद्ध अभियोग पक्षाने सादर केलेल्या सर्व पुराव्याचा योग्य विचार केला. अभियोग पक्षा चे प्रकरण कमकुवत पायावर उभे आहे आणि दोषसिद्धीची शक्यता धूसर असण्याची शक्यता आहे या निष्कर्षावर पोहोचताना, उच्च न्यायालयाने खालीलप्रमाणे नोंद केलीः

> " कोणत्याही प्रकारे या समस्येचा पूर्वग्रह न बाळगता मी हे सांगणे आवश्यक आहे की फिर्यादी प्रकरणाचा महत्त्वाचा मजकूर काहीसा आश्चर्यकारक वाटतो. विद्यार्थ्यांची एक संघटना परिक्षकाला त्याचे गुण वाढवण्यासाठी पैसा देते. असे म्हटले जाते, हे केले गेले आणि उत्तरपुस्तके संलग्न केली गेली. या घटनेनंतर सुमारे सात दिवसांनी प्रथम माहिती अहवाल दिला जातो. गुन्ह्याची माहिती पोलीस ठाण्याला दिली जाते आणि तरीही ए. सी. बी. द्वारे मार्च १९८७ पर्यंत तपास सुरू केला जातो. याचिकाकर्त्याकडे काहीही गुन्हादर्शक आढळले नाही ".

आम्ही नोंदींचा अभ्यास केला आहे आणि उच्च न्यायालयाने व्यक्त वरील मतांशी आम्ही सहमत आहोत. आम्हाला आढळले की कथित सापळ्यात कोणत्याही पोलीस संस्थेचा सहभाग नव्हता; सात दिवसांनंतर एफ. आय. आर. दाखल करण्यात आला; आरोपींच्या ताब्यात कोणतीही गुन्हादार्शक वस्तू सापडले नाहीत आणि घटनेच्या दहा महिन्यांनंतर पोलिसांनी साक्षीदारांची जबाब नोंदवले. आरोपींविरोधातील गंभीर संशयाबाबत बोलायचे तर खरे तर फिर्यादी पक्ष कोणताही संशय व्यक्त करू शकलेला नाही. त्यामुळे, आम्ही असे मानतो की अपीलकर्त्याविरुद्ध प्रथमदर्शनी सयुक्तिक बाजू तयार करण्यात आली नव्हती.

आम्हाला सध्याच्या अपीलात योग्यता आढळते आणि त्यानुसार आक्षेपित न्यायनिर्णय रद्द करून त्याला अनुमत केले जाते आणि परिणामी अपीलकर्त्याविरुद्धची फौजदारी कार्यवाही रद्द केली जाते.

के. के. टी

अपीलाला अनुमत करण्यात आले.

**अस्वीकरण**

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी वैध मानला जाईल."